(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT /Vol. XII / Issue – I ISSN 2277-8063

# महात्मा गांधी यांच्या सर्वोदय विचारांचा वारसा : विनोबा भावे

**भारतभूषण विश्वास महाले,** संशोधक विध्यार्थी, राज्यशास्त्र विभाग , शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

---

**प्रस्तावना :**

महात्मा गांधी यांच्या मूलभूत चिंतन सर्वोदय विचार प्रामुख्याने भारतीयत्वावर आधारलेले आहे. यात नैतिक नियमांना अधिक महत्व आहे. गांधीजी नैतिकतेचा अर्थ मानवी स्वभावाचे उल्लंघन करणे तसेच प्रत्येक मानवी क्षेत्रामध्ये नैतिकतेचे पालन करणे असा अभिप्रेत करतात. त्यांच्या या सर्वोदय विचाराची प्रेरणा रस्किनच्या 'अन् टू धिस लास्ट' या पुस्तकावरून प्राप्त झालेली दिसून येते. महात्मा गांधींच्या तत्त्वांनी आणि विचारसरणीने आकर्षित होऊन त्यांनी राजकीय आणि आध्यात्मिक दोन्ही दृष्टिकोनातून गांधींना आपले गुरू विनोबा भावे यांनी मानले. विनोबा भावे यांनी गांधींच्या शिकवणीने भावे यांना भारतीय ग्रामीण जीवन सुधारण्यासाठी समर्पित जीवनाकडे नेले. महात्मा गांधी यांचे सर्वोदय विचाराचा विस्तार विनोबा भावे यांनी केलेला आहे.

**सर्वोदय विचार :**

गांधीजींनी ‘सर्वोदय’ या पुस्तकात गांधीजींनी तीन सिध्दांतांची मांडणी केली.

१) सर्वांच्या कल्याणातच आपले कल्याण आहे.

२) वकील काय किंवा हजाम काय, दोघांच्याही कामाची किंमत सारखीच असली पाहिजे. कारण पोटापाण्याचा हक्क दोघांनाही सारखाच आहे.

३) साधे अंगमेहनतीचे, शेतकऱ्याचे जीवन हेच खरे जीवन होय.

गांधीजींनी या तीन सिध्दातांचा सर्वोदय विचाराचा गाभा म्हणून स्वीकार केला. गांधीजींच्या 'आदर्शराज्य ग्रामराज्य' या विचारावरही सर्वोदय विचारांचा प्रभाव जाणवतो. गांधीजींनी आदर्श राज्य हे स्वयंनियंत्रित अहिंसक समाजावर आधारित असावे व अहिंसक, राज्यविहीन अशा समाजाच्या कामकाजाचे संचलन विकेंद्रीत राज्यव्यवस्थेमार्फत केले जाईल असे स्पष्ट केले. सर्वोदयातील ‘सर्वाच्या कल्याणातच आपले कल्याण आहे’ या तत्वांचा प्रभाव विश्वस्त संकल्पना, राज्यरचनेवर जाणवतो. महात्मा गांधीजींवर पडलेल्या सर्वोदय विचारांचा प्रभाव त्यांचे सर्वोत्तम शिष्य विनोबा भावे यांच्यावर पडला. गांधीजींच्या निधनानंतर भारतीय राजकीय विचारांमध्ये सर्वोदय विचारांचा आशय व विकास करण्यामध्ये विनोबा भावे व जयप्रकाश नारायण यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. गांधीजींच्या हत्येनंतर त्यांच्या अनुयायांचे एक संमेलन सेवाग्राम येथे संपन्न झाले, त्यावेळी सर्वोदय समाज आणि सर्वसेवासंघ यांची स्थापना करून गांधीजींचे अपुरे कार्य तडीस नेणे या स्थूल उद्दिष्टांनुसार या संस्थेचे कार्य सुरू करण्यात आले.

**विनोबा भावे आणि सर्वोदय :**

भूदान यज्ञाचा हेतू, भूमिहीनांना जमीन मिळवून देण्याइतका सीमित नव्हता तर, साम्ययोगाची किंवा सर्वोदयाची वृत्ती जनतेत निर्माण करणे, हा होता. व्यवस्थेतील विषमता नष्ट करत असताना सर्व संबंधिताचा मानवीय विकास त्यांना करावयाचा होता. भूदान यज्ञा बरोबरच विनोबा भावेंनी संपत्तीदान यज्ञदेखील सुरु

केला. आपल्या संपत्तीचा सहावा भाग संपत्तीदान यज्ञात द्यावा, संपत्तीदान ही एक जीवननिष्ठा झाली पाहिजे. संपत्तीदान यज्ञाचा मूळ विचार अपरिग्रह व अस्तेय या तत्त्वांवर आधारलेला होता. भूदान यज्ञाच्या मूळ विचारधारेला विनोबा 'साम्ययोग' असे म्हणतात. साम्ययोग विचारसरणी विनोबांनी साम्यवादाला पर्यायी विचारसरणीच्या स्वरुपात मांडली. साम्ययोग 'सर्वाभूती एक आत्मा' या भौतिक विचारावर आधारलेला होता. दुस-याच्या विकासात स्वतःचा अभ्युदय पहाणे ही साम्ययोगाची समग्रदृष्टी आहे. या साम्ययोगाच्या पायावर विनोबांची सर्वोदय संकल्पना उभारली आहे. सर्वोदय समाजाच्या वैचारिक भूमिकेचा विस्तार करण्यामध्ये विनोबांनी महत्त्वाची भूमिका बजावली. विनोबांनी सर्वोदय समाज सर्वसमावेशक निर्माण केला. अहिंसेचा विचार अधिक व्यापक करण्यासाठी सर्वोदय कार्यकर्त्याने संस्था संप्रदाय किंवा पक्ष अशा कोणत्याही संस्थांमध्ये पद स्वीकारता कामा नये अशी विनोबांनी भूमिका मांडली.

**विनोबा भावे आणि भूदान चळवळ :**

विनोबा गांधीजींच्या सर्वोदय विचाराचा विकास करतात. सर्वोदय विचार अधिक आशय संपन्न व गहन करतात. गांधीजींच्या विचारांना सैद्धान्तिक पातळीवर आणण्याचे कार्य विनोबांनी केले. विनोबांनी गांधींना अपेक्षित असलेल्या सर्वोदय राज्यव्यवस्थेला अधिक विकसीत केले. विनोबांनी सर्वोदय विचार भूदान चळवळीच्या माध्यमातून रुजविण्याचा प्रयत्न केला.

भारतभर फिरणारे विनोबा एकेदिवशी पोचमपल्लीला उतरले होते. तिथं भूदानाची कल्पना मांडल्यावर गावातल्या एका श्रीमंत शेतकऱ्याने आपली जमीन दान देण्याचा निर्णय घेतला. झालं तेव्हापासून विनोबांचा भूदानाचा यज्ञ सुरू झाला. विनोबांच्या भूदान चळवळीनं स्वातंत्र्योत्तर काळात अत्यंत शांततेत एक सामाजिक क्रांतीच केली होती. अशा प्राक्रे १८ एप्रिल १९५१ रोजी विनोबांना पहिले 'भूदान' मिळाले. पुढे चौदा वर्षे विनोबा भूदान मागत भारतभर पायी फिरले. जनतेने विनोबांना ४७ लाख एकर जमीन भूदानात दिली. सुमारे आठ लाख भूमिहीनांना ती वितरित केली गेली. विनोबा भूदानकार्याला 'भूदान-यज्ञ' संबोधित. विनोबा म्हणत, 'महाभारतात राजसूय यज्ञाचे वर्णन आहे. माझा हा प्रजासूय यज्ञ आहे. यात प्रजेला राज्याभिषेक होईल. विनोबांना राज्य नको, तर प्राज्य हवे होते. राजाचे असते ते 'राज्य' व प्रजेचे असते ते 'प्राज्य'! म्हणूनच विनोबा 'राज्या'ऐवजी 'प्राज्या'ची आणि 'राजनीती'ऐवजी 'लोकनीती'ची भाषा बोलत होते. विनोबा लोकांना शासनाकडून स्वयंशासनाकडे, सत्तेकडून स्वातंत्र्याकडे, नियंत्रणाकडून संयमाकडे, अधिकाराकडून कर्तव्याकडे.. अर्थात् राज्याकडून प्राज्याकडे आणि राजनीतीकडून लोकनीतीकडे नेऊ इच्छित होते. आणि म्हणूनच विनोबा भूदान-यज्ञाला प्रजासूय-यज्ञ म्हणत होते.

अशा प्रकारे भूदान चळवळ द्वारे विनोबांनी गांधीजींच्या विश्वस्त संकल्पनेचा विस्तार केला. तसेच विनोबांनी भूदान चळवळीच्या माध्यमातून सर्वोदय विचारसरणीचा वैचारिक पाया अधिक व्यापक केला.

सारांश :

भारतीय समाजव्यवस्थेतील प्रश्न सर्वोदय विचाराच्या आधारे बदलता येतील अशी गांधीजींची भूमिका होती. यासाठी गांधीजींनी रचनात्मक कार्यक्रमाची मांडणी केली आहे. रचनात्मक कार्यक्रमालाच विधायक कार्यक्रम, चिरस्थायी विकासाचा मार्ग आहे. त्या मार्गाचा विस्तार विनोबांनी केला. विनोबांनी सर्वोदय समाजाच्या वैचारिक आधारांमध्ये सत्याग्रहाचा नवा अर्थ स्पष्ट केला आहे. तसेच विनोबांनी भूदान चळवळीच्या माध्यमातून सत्य, प्रेम, करुणा हा संदेश देत लोकांना उपजीविकेचे साधन उपलब्ध करून दिले.

संदर्भ :

1. प्रा. सु. श्री. पांढरीपांडे (२०१०) ‘विनोबांचे स्वराज्यशास्त्रः अवलोकन आणि आकलन’ प्रतिमा प्रकाशन, पुणे.

2. इंदु टिकेकर (१९७९) 'सर्वोदय क्रांतीचे समग्र दर्शन' सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला ट्रस्ट, पुणे,.

3. दिवाण वि. प्र. (२०१३) 'आचार्य विनोबा भावे', आचार्य विनोबा भावे जन्मस्थान प्रतिष्ठान, गागोदे,

4. महाराष्ट्र टाईम्स वृत्तपत्र

5. दैनिक लोकसत्ता